# प्रेस नोट

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | गोंदिया |
| --- | --- |
| फिर्यादी | श्री निलेश सुरेश लोधी, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया मो. क्र. ७६२०३८३८८८. |
| पोलीस ठाणे अपराध क्रमांक व कलम | गोंदिया शहर अप.क्र. ४४९/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनीयम १९८८ (संशोधन २०१८) |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आलोसे श्रीमती शालु कमलेश कावळे वय ३६ वर्ष, पद महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय गोंदिया |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार हे भारतीय नौसेनाचे माजी सैनिक व पोलीस खात्यातुन सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक असुन ते ग्राम तेढवा ता. गोंदिया येथील सिलींगची जमीन भुमापन क्र.१७४ वर सन २००२—२००३ पासुन अतिक्रमण करुन शेती करत आहेत. माजी सैनिक असल्याने शासनाकडुन सदर सिलींगची जमीन मिळावी म्हणुन दिनांक ७.५.२०२६ रोजी मा.तहसिलदार गोंदिया यांना त्यांचे ताब्यात असलेली जमीन Maharashtra Agricultural Land (Celling on Holding's) Act1961 अंतर्गत अतिक्रमण नियमीत करुन त्यांचे नावावर देण्यात यावी याबाबत अर्ज केला होता. त्यांचे अर्जावर कार्यवाही करण्याकरीता तहसिल कार्यालय गोंदिया येथील लिपिक श्रीमती शालु कावळे हया ५०,०००/— रु. ची मागणी करीत असल्याने त्यांनी दिनांक १६.०६.२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे तक्रार नोंदविली.<br><br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक १६.०६.२०२६ चे १२.१२ वा ते १३.५७ वा पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही व दिनांक १७.०६.२०२६ चे ११.३३ ते १२.३९ वा सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्रीमती शालु कमलेश कावळे पद—महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय गोंदिया, यांनी तक्रारदार यांना त्यांचे ताब्यात असलेली सिलींगची अतिक्रमीत जमीन भुमापन क्र.१७४ माजी सैनिक म्हणुन त्यांचे नावावर नियमीत करुन देण्याचे दिलेल्या अर्जावर कार्यवाही करण्याकरीता रु.५०,०००/— ची लाच रक्कमेची मागणी करुन त्यापैकी आता रु.१०,०००/— लाच रक्कम देण्यास व काम झालेवर उर्वरीत रु. ४०,०००/— लाच रक्कम देण्याबाबत बोलुन रु. १०,०००/— लाच रक्कम स्विकरण्याची तयार दर्शवुन ती लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारुन गैरफायदा घेतला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया तर्फे सर्व नागरीकाना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचार संबधाने कोणी लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास ला.प्र.वि महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेशी संपर्क करावा.

**संपर्काचा पत्ताः—** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया, तिरोडा रिंग रोड, रेल्वे क्रासिंग जवळ गोंदिया पिन ४४१६०१

**संकेत स्थळः—** acbmaharastra.gov.in

**ईमेलः—** dyspacbgondia@mahapolice.gov.in

**टोल फ्रि क्रमांक :—** १०६४

**दुरध्वनी क्रमांक :—** ०७१८२ २५१२०३

**व्हॉटसअ्प क्रमांकः—** ९२०९०४१०६४, ७६२०३८३८८८